# बस; प्यार ही प्यार पले..

किशोरकुमार...ज्याच्या एका व्यक्तिमत्वात अनंतरंगी छटांची अनंत व्यक्तिमत्वं दडली होती, असा खराखुरा कलंदर, मनस्वी आणि अमर्याद प्रतिभेचा धनी कलाकार.. कुठलीही एक कला साध्य करताना आयुष्य पणाला लागतं, इथे तर देवाने गायन, अभिनय, लेखन, संगीत दिग्दर्शन, गीत लेखन, चित्रपट दिग्दर्शन अशा अनेक कलागुणांची खैरात केलेली ! असे कलाकार घडवता येत नाहीत.. ते 'वरूनच' यावे लागतात. अशांपैकी एक कलाकार म्हणजे किशोर. रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत तो फक्त 'कलाकारच' होता. त्याला सामान्य माणसाची मोजमापं लावणं म्हणजे त्याच्या प्रतिभेचा अपमान ठरावा. मोजक्याच संगीत रचना देऊन ज्याने खूप काही व्यक्त केलं असा 'संगीतकार' किशोरकुमार !

किशोरकुमारचा 'संगीतकार' म्हणून आपण जेव्हा विचार करतो, तेव्हा एक महत्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की तो रूढार्थाने 'संगीतकार' नव्हता. म्हणजे 'संगीत देणं' हे मुख्य कार्यक्षेत्र कधीच नव्हतं.. पण किशोर सारख्या कलाकाराची स्वच्छंद मुशाफिरी अशा कप्प्यांमध्ये ठेवता येत नाही. असे कलाकार हे फक्त 'व्यक्त' होत असतात.. मनस्वीपणे.. मग त्यांना जे 'माध्यम' मिळतं, त्याप्रमाणे त्या 'मजकुराची' परिभाषा बदलते. किशोरला गायला मिळाल्यावर, त्याच्या आवाजाचा तो विलक्षण हेवा करावा असा 'throw', उच्चारांची खास पध्दत, या गोष्टींनी आपल्याला व्यापून टाकलं.. त्यानं गाणी लिहिली, तेव्हा खांडवा या मूळ गावाशी त्याचं nostalgic नातं, त्या आयुष्याची तीव्र ओढ, आणि 'जीवन' या गोष्टीची त्याची खोल समज व्यक्त झाली.. आणि संगीत देताना, या वरकरणी 'दंगेखोर', महामिश्कील माणसाच्या अंतरंगात किती खोल, तरल आणि प्रचंड संवेदनशील philosopher दडलेला आहे, हे त्यानं दाखवून दिलं.. किशोर फक्त गात राहिला असता, तर त्याच्या अंगागात भिनलेला अभिनय आपल्याला कळलाच नसता.. किंबहुना, खरं तर किशोर आधी अभिनयच करत होता, नंतर गायनाकडे त्यानं गांभीर्याने बघितलं.. तद्वत, त्यानं संगीत दिलं नसतं, तर सुरांच्या सुरेख रचना, त्यांची अभिव्यक्ती, शब्दमांडणीतलं त्याचं कौशल्य, आणि काळाला पुरून उरणारं गीत निर्माण करण्याची त्याची प्रतिभा, यापासून आपण वंचित राहिलो असतो.. नुकसान आपलंच झालं असतं..

एखादा गायक अभिनेता जेव्हा संगीत देतो, तेव्हा त्यात अनेक गोष्टी एकत्र येतात. ती चाल गात गातच जन्माला येत असावी.. पण विचार प्रक्रियेत काही फरक असतो का? हे बघायला गेलं, तर जाणवतं, की मुळात चित्रपटसंगीत हे शब्दाभिनय प्रधान, आणि भावनाप्रधान आहे. रूढार्थाने अभिनेता नसलेला संगीतकार सुध्दा चाल बांधताना त्यात अभिनय गुंफतोच की.. म्हणूनच, expression महत्वाचं आहे, माध्यम नव्हे.. किशोर जेव्हा चाल बांधतो, तेव्हा त्यात शब्दांना न्याय देतोच, पण त्याच्यातला अभिनेता त्याला वेगळंच परिमाण देऊन जातो.. मोजकी गाणी देऊनही, किशोरकुमारने, आपण याही क्षेत्रात दर्जेदार काम करू

शकतो हे दाखवलंच, पण स्वतः अनेक संगीतकारांकडे गाऊनही स्वतःची शैली जपली, हे जास्त कौतुकास्पद वाटतं. गायक जेव्हा संगीतकाराकडून ‘चाल’ शिकतो, तेव्हा फार क्वचित वेळा, तो त्यात ‘स्वतःचं’ असं काही अंतर्भूत करू शकतो. ज्याला आपण creative inpute किंवा improvisation म्हणतो, ते पार्श्वगायनाच्या संदर्भात, फार तर उच्चार, एखादया शब्दावर जोर देणे, आवाजाचा लगाव, शब्दमांडणी किंचित बदलणे, एखादी हरकत, संगीतकाराची ‘हरकत’ नसल्यास घेणे, यापुरतं मर्यादित असतं. वर्षानुवर्षे ही प्रक्रिया घडत असताना, बुध्दी आणि गळ्याला एक सवय लागते, ती म्हणजे ‘संगीतकाराने सांगितल्या बरहुकूम गाणे’. यात नवनिर्मितीच्या शक्यता खूप कमी होतात. या पार्श्वभूमीवर विचार करता असं दिसतं की शेकडो संगीतकारांकडे हजारो गाणी गाऊनही, संगीतकार म्हणून किशोरला त्याची शैली गवसली, त्याच्या चालींमध्ये, मुख्य म्हणजे अभिनिवेश नाही, कुठल्याही संगीतकाराची नक्कल नाही, हो, ती बंगाली मींड, ते शब्द वळवणं.. हे रक्तातून आलेलं.. नक्कल नाही म्हणता येणार!

किशोर कुमारच्या व्यक्तिमत्वातला एक महत्वाचा घटक म्हणजे विलक्षण सहजता.. ती त्याच्या गायनात होती, अभिनयात होती, लिखाणात होती आणि अपरिहार्यपणे संगीत देण्यातही दिसते. त्याच्या चाली कुठेही वेडया वाकडया, कसरती करायला लावणाऱ्या नाहीत. दंगेखोर किशोर यात जास्त दिसत नाही.. ‘मैं हू झुम झुम झुमरू’ सारखं गाणं सोडलं तर प्रामुख्याने तरल, शांत आणि सौम्य चाली किशोर ने दिल्या..

उत्तम चाल ही वेड्या वाकडया वळणांचीच असायला हवी असं नसतं.. चाल ‘उत्तम’ असणं म्हणजे तिला एक graph असणं.. रचना म्हणून अस्तित्व असणं.. आणि गाताना खूप समाधान मिळावं अशी तिची ‘मेलडी’ असणं.. या सगळ्या निकषांना किशोरच्या चाली कशा सुरेख उतरतात पहा.. त्याचं अत्यंत भावणार composition म्हणजे ‘आ चल के तुझे मैं ले के चलूँ इक ऐसे गगन के तले’ (दूर गगन की छाँव में), एक निखळ आशावाद, एक निष्पाप कल्पना.. थोडीशी स्वप्नाळूच.. पण काय हरकत आहे असं स्वप्नं तरी पहायला? आपण स्वप्नांवरच तर जगतो ना.. उद्याची स्वप्नं डोळ्यात नसती तर आजच विझले असते हे डोळे.. ज्याच्या संवेदना जिवंत आहेत.. ज्याला ‘तिरस्कार’ ही भावनाच हद्दपार व्हायला हवीय, ज्याला निसर्ग खुणावतोय, ज्याला हे ही माहिती आहे की ‘धूप’ मिळणारच आहे.. रस्ता कठीण असणार आहे.. पण तो प्रवास सुध्दा सोपा वाटेल.. या आशेच्या ताकदीवर.. प्रेमाच्या उबेत.. निसर्गाचे विविध विभ्रम बघत, दिवस रात्रीचं अनुपम सौंदर्य बघत, निसर्ग कितीतरी दिशांनी खुणावतोय, त्याला प्रतिसाद देत.. सरेल की हे आयुष्य.. जिथे प्रेम, प्रेम आणि प्रेमच असेल.. असं लिहिणाऱ्या किशोर ला अंतर्यामी फक्त निखळ प्रेमाची कशी ओढ होती हे जाणवतं..

सूरज की पहली किरन से आशा का सवेरा जागे

चंदा की किरन से धुलकर घनघोर अंधेरा भागे

कभी धूप मिले कभी छाँव खिले लंबी सी डगर ना खले

जहाँ गम भी न हों, आँसू भी न हो जहाँ प्यार ही प्यार पले

हे गीत किशोरनंच लिहिलं.. हे किती बरं झालं.. कारण हा आशावाद, हे स्वप्नवत वाटणारं हे जग, त्यानंच शब्दात मांडलं, संगीतबध्द केलं, आणि जीव ओतून गाऊन, शब्दांना खास डोलवत, झुलवत, खरंखुरं वाटायला लावलं..

कोई ‘गैर’ न हो, कहीं ‘बैर’ न हो

म्हणताना, शब्दांच्या sound कडे त्याचं असलेलं लक्ष जाणवतं.. ‘एक ऐसे गगन के तले’ मध्ये ‘ऐसे’ शब्दाला जोडलेला स्वर, दिलेला हलकासा जोर सांगून जातो की ‘कसं’ जग अपेक्षित आहे!

जहाँ दूर नजर दौडाए

आजाद गगन लहराए..

खरोखर क्षितिजाकडे आर पार पाहताना या ओळी ज्याला आठवत नाहीत.. गुणगुणाव्याश्या वाटत नाहीत, त्याच्या डोळ्यांत ते आभाळ तरी का सामावेल.. आपल्या इवल्याश्या डोळ्यात सगळं आसमंत आपण भरून घेऊ शकतो.. जर आपल्याला ‘ती’ नजर असेल तर.. या गाण्यानं ती ‘नजर’ आपल्याला दिली.. इथली रात्रसुध्दा ‘चंदा की किरन से धुलकर’ येते.. साध्या सोप्या कल्पना, साधी सोपी, कुणालाही गुणगुणता येईल अशी चाल, पण विचार केला तर खूप खोल.. आतली हुरहूर, वादळ शांत करणारं हे गाणं.. ‘बस प्यार ही प्यार’ हे शब्द प्रेमात आकंठ बुडून येतात.. ‘प्यार’ हा शब्द किती गोंजारावा.. किती वात्सल्य पेरावं त्यात.. किंचित अवरोही येऊन पुन्हा आरोही जाणारी ‘प्यार ही प्यार’ ही phrase मला या गाण्याचा उत्कट सौंदर्यबिंदू भासते.. या गाण्याचं बोट धरून मी कित्येकदा ‘त्या’ जगात फिरून येते.. मग आतून शांत शांत वाटायला लागतं.. ती फ्लूट, माऊथ ऑर्गन.. डोळे क्षितिजावर खिळवावेत.. हे गाणं अनुभवावे.. गुणगुणावं.. आणि ‘अशा’ जगाचं ओलावलेल्या पापण्यांनी स्वागत करावं.. फक्त प्रेमच करावं.. अथांग.. अव्याहत..

किशोर आतून किती वेगळा होता, हे जाणवून देणारं, दुसरं गाणं..

‘ठंडी हवा ये चाँदनी सुहानी,

ऐ मेरे दिल, सुना कोई कहानी..’

सुंदर चाल.. त्याच्या ‘झुमरू’ पणाला एक वेगळं मस्त परिमाण देणारं गाणं.. वेस्टर्न ढंगातलं.. मजरूह सुलतानपुरींचे शब्द..

‘सर रखके आँसमापे पर्बत भी सो गए..’

ही किती गोड कल्पना! एक मस्त मगन मुसाफिर.. चाललाय स्वतःच्याच धुंदीत.. अनजान्या मंजिलच्या शोधात..

‘मिले चैन मुझे मेरी जांऽऽऽ’

म्हणत वर जाऊन किंचित थबकणं.. ‘मेरे दिल तू सुना’ वेगळ्याच मिश्किल ढंगात म्हणणं.. क्या बात है.. स्वतःच्या ‘यॉडलिंग’ चा, स्वच्छंदपणा व्यक्त करण्यासाठी कल्पक वापर करत हे गाणं किशोरनं गायलय..

१९३६ सालच्या न्यू थिएटर्सच्या ‘जीवननैया’ मधलं अशोककुमारनं गायलेलं सरस्वती देवींच्या संगीताने सजलेलं, ‘कोई हमदम न रहा, कोई सहारा न रहा’ हे गाणं.. किशोरनं पुनरुज्जीवित केलं.. पण ‘कोई हमारा न रहा’ म्हणताना ‘ह’ शब्दावरचा त्याचा घुमारा.. एक कळ घेऊन येतो.. स्वतःला उध्वस्त होण्याच्या मार्गावरून पुन्हा परत फिरायला लावेल असा ‘इशारा’ राहिला नाही.. ती हाक राहिली नाही, मग का जगायचं? ‘कोईऽऽ’ शब्द किंचित लांबतो.. तो खरंच सांगून जातो की खरंच ‘कोणीही’ आपले नसतं.. प्रत्येक कडव्याच्या शेवटी येणारी ती ‘न रहा’ ही ओळ, त्या आधीचा पॉज.. काळजात जखम करतोच.. खरा कलाकार कोण? जो जख्म देता है, दवा भी देता है.. या गाण्यानं केलेली जखम, ‘आ चल के तुझे’ ने भरून काढतो किशोर..

‘राही तू मत रूक जाना’ हे सुध्दा एक खूप आशावादी गाणं.. शैलेन्द्र चे प्रभावी शब्द, हेमंतदांचा विलक्षण आश्वस्त करणारा, अत्यंत परिपक्व आवाज.. किशोरची सुंदर चाल.. ‘कहीं तो मिलेगी तेरी मंजिल’ हे शब्द खास हेमंतदांसाठीच खर्जात बांधले असावेत.. ‘कहीं दूऽऽर’ ही मंद्र सप्तकाच्या पंचमापासून मध्य सप्तकाच्या पंचमापर्यंत जाणारी मींड, त्या दूऽऽऽर चा अहासास देते..

‘जिन रातों की भोर नाही.. आज ऐसी रात आयी..’(दूर गगन की छाँव में) हे पण खूप साधंसुधं, हलक्या हळुवार आवाजात गायलेलं गाणं.. मागे फक्त हार्मोनियम आणि तबला..

राह किसीकी हुई ना रोशन,

जलना मेरा बेकार गया..

ही खंत, ही व्यथा खूप तरल पणे येते..

तसंच,

कोई लौटा दे मेरे बीते हुए दिन..

हे एक दु:खी तरीही जलद लयीतलं गाणं.. व्हायोलिनच्या स्वरात मिसळून, आतून येणारी 'ओऽऽ मेरे ख्वाबोंके महल..' खूप कळवळून म्हंटलीय.. सगळं गाणंच खूप अनोखी हुरहूर.., चटका लावणरं.. पडद्यावर किशोर गात नाही.. मनातला उठलेला कल्लोळ शैलेन्द्र ने शब्दाशब्दात सामावलाय.. 'हाए' शब्दातला हुंदका केवळ अप्रतिम.. शैलेंद्रच्या जाणीवांना स्वररूप मिळतं.. एक कवी म्हणून शैलेन्द्र अशा गाण्यांमध्ये जास्त उठून दिसतो.. कारण इथं शब्दांना जास्त महत्व आहे. किशोर स्वतःच्या कुठल्याही 'शैलीत' अडकलेला संगीतकार नसल्यामुळे हे घडलं असावं..

याशिवाय कितीतरी अप्रतिम गाणी किशोरनं दिली.. किशोरनं दिलेलं सुलक्षणा पंडितसह गायलेलं 'बेकरार दिल तू गाये जा' हे गाणं किती वेगळ्या वजनाचं! पियानोची सुंदर साथ त्या गाण्याला आहेच पण व्हायोलिन्स खूप घनगंभीर आहेत.. 'पंथी हूँ मै उस पथ का, जीवन से ना हार जीनेवाले..' तसंच इरशादनंच लिहिलेलं 'दूर का राही' मधलं 'खुशी दो घडी की मिले ना मिले..' हे इतकं शांत स्वतःशी संवाद केल्यासारखं.. स्वतःशी बोलत बोलत, विचार करत गायल्यासारखं गाणं.. त्या दृश्याला अधीक परिणामकारक करणारं गाणं जरूर ऐकण्यासारखं.. 'एक दिन और गया' (शैलेन्द्र, मन्ना डे) हे बंगाली लोकसंगीताची आठवण करून देणारं गाणं.. अशी गाणी ऐकताना जाणवतं की थोडयाश्या हळवेपणाकडे, किंचित 'आहे मनोहर तरी गमते उदास' असं वाटायला लावणाऱ्या सुरावटींमधून किशोर व्यक्त झाला.. कदाचित व्यक्तिगत आयुष्याचं प्रतिबिंबच असावं ते.. लताबाईंच्या आवाजात त्यात केलेली बंगाली गाणी (उदा. प्रियतमा की लिखी तोमार..) सुध्दा गाजली..

किशोरची अजून खूप गाणी यायला पाहिजे होती.. कारण अंतर्यामी अस्वस्थ, गंभीर, एका सुप्त वादळासारखा हा कलाकार आपल्याला अजून खूप देऊन गेला असता..तरीही त्याच्या मोजक्या गाण्यातल्या सृजनशक्तीला, हळवेपणाला, जीवनावरच्या आसक्तीला, गतस्मृतीच्या काळात हरवून जाणारं बालपण शोधण्याच्या धडपडीला.. मनापासून सलाम!

डॉ.मृदुला दाढे-जोशी
email: mrudulasjoshi@gmail.com